महाराष्ट्र शासन

माहितीचा अधिकार

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

फोन नं. ०२२-२२६२०६६८, ६९, ७० फॅक्सः ०२२ २२६२०७८९ संकेत स्थळ: www.gdcmumbai.org

क्र.शादंमवरुमुं/दंतऔषधी व सामुग्री/खवि/ऑनलाईन-दरपत्रके/ २२६ /२०२०, दिनांक:-१५/०९/२०२०

**अतितात्काळ ऑनलाईन दरपत्रक**

**विषय :-** शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई या संस्थेतील भांडार विभागाने दंतऔषधीसामुग्रीची मागणी केल्यानुसार साहित्य पुरवठा करण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये नमुद केल्यानुसार खालील नमूद दंतऔषधीची या संस्थेतील विविध विभागात येणाऱ्या दैनंदिन रुग्णांच्याउपचारा करीता लागणारी दंतऔषधी सामुग्री तातडीने खरेदी करण्यासाठी आपणाकडून ऑनलाईन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरहू दरपत्रके शील बंद लिफाफयातुन अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई येथे दिनांक १७/०९/२०२० पुर्वी या कार्यालयात सादर करण्यात यावीत. विलंबाने सादर केलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

| अ.क्र | सामुग्रीचे नांव | संख्या नग |
|---|---|---|
| 01 | Light Cure composit kit | 50 pkt |

उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या सामुग्रीचे दरपत्रक सादर करताना त्यावर सामुग्रीचा अनुक्रमांक, नाव नमुद करण्यात यावे. तसेच या संस्थेस प्राप्त झालेले दरपत्रके खरेदी समिती समोर दिनांक १८/०९/२०२० रोजी १२.०० वाजता उघडण्यात येतील. आपणांस दरपत्रके उघडण्याच्या प्रक्रियेत भाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित रहावे. तसेचसदरचेदरपत्रककार्यालयाच्यासंकेतस्थळ **www.gdcmumbai.org** वरप्रसिध्द करण्यात येतील याची नोंद घ्यावी.

अधिष्ठाता

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

**अटी व शर्ती**

१) सदर दरपत्रक सिलबंद लिफाफयात देण्यात यावेत. तसेच लिफाफयावर सामुग्रीचे नाव नमुद करण्यात यावे.

२) सदरील दरपत्रके अधिकृत लेटरहेड वर सादर करावे. त्यासोबत व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी क्लिअरन्स सर्टिफिकेट,जीएसटी नंबर किंवा तत्सम प्राधिकरणाची नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत तसेच पॅनकार्ड प्रत, औषधीद्रव्ये विभागाची वैध मान्यता/परवानगी प्रमाणपत्र सदर सामुग्री पुरवठा करण्यास कंपनीने प्राधिकृत व वैध प्रमाणपत्र माहितीपत्रक (कॅटलॉग)इत्यादी माहिती सादर करणे बंधनकारक आहे.

३) प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल. तसेच वरील सर्व कामे ही एकाच फार्मच्या अखत्यारीत संघर्ष नसल्याबाबत तसेच एकल निविदा देण्याबाबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४) दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावाप्रमाणे असावेत. सदरचे वस्तूची निव्वळ किंमत व इतर सर्व कर हे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. तसेच उपरोक्त साहित्य हे पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त आठ (०८) दिवसांत सामुग्रीचा पुरवठा करण्यात यावा. सदरील सामुग्री पुरवठा करण्यात विलंब झाल्यास देयकामधून नियमानुसार कपात करण्यात येईल.

५) उपरोक्त नमुद सामुग्री हि विर्निदेशानुसार असणे आवश्यक असून, आयएसआय मार्क किंवा तत्सम समान दर्जाची व उत्कृष्ठ आवश्यक आहे.

६) सदर बाबीसाठी कोणत्याही वस्तुसाठी शासनाचे दरकरार उपलब्ध झाल्यास सदरील भरण्यात आलेले दरपत्रक वगळण्यात येतील यांची नोंद यावी.

७) संबंधितांकडून दंत औषधी व सामुग्री चा मागील अनुभव असल्यास त्याची प्रत सोबत साक्षांकित करुन देण्यात यावे.

८) दरपत्रकांवर नमुद सामुग्रीची हमी कालावधी नमुद करावा. तसेच सदर वस्तुचे नमुने तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

९) शासकीय नियमानुसार दुसरा व चौथा शनिवार व रविवार, तसेच जोडून आलेली सार्वजनिक रजा वगळून दरपत्रके सादर करण्यात यावीत, याची नोंद घ्यावी. दरपत्रके पोस्टाने पठविण्यात आल्यास स्विकारल्या जाणार नाहीत.

१०) दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार अधिष्ठता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई यांना आहे.

११) सविस्तर अटी व शर्ती वाचूनच दरपत्रके भरण्यात यावेत.